# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३**

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: १८३, रूपये:- ६,००,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१) | ५९२३ | १० | राज्यामध्ये संजय गांधी निराधार योजना चालू असून संजय गांधी निराधार योजने अंतर्गत खारोडी, मालवणी, मढ, आक्सा, भाटी गाव, अंबोजवाडी, मालाड (पश्चिम) मुंबई येथील स्थानिक रहिवाशांनी संजय गांधी निराधार योजने अंतर्गत तहसिलदार, तहसील कार्यालय, बोरिवली मुंबई यांच्याकडे अर्ज सादर केले असणे, सदरच्या योजनेअंतर्गत १५९ अर्ज प्रलंबित असणे, त्यामुळे स्थानिक रहिवाशांना सदरच्या योजनेचा लाभ मिळत नसणे, स्थानिकांना लाभ मिळण्याची आवश्यकता असणे, संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी त्यांच्या असंतोषं निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: १८७, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२) | ५९७४ | १० | मालवणी, अंबोजवाडी, भाटी गाव, मढ, पारसवाडी, आक्सा गाव, मालाड पश्चिम, मुंबई या परिसरातील स्थानिक नागरीकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळत नसणे, तहसील कार्यालयाकडे १९ अर्ज प्रलंबित असणे, त्यामुळे त्यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजनेचा लाभ मिळत नसणे, स्थानिक रहिवाशांना सदरच्या योजनेचा लाभ मिळण्याची आवश्यकता निर्माण झाले असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिका निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १९०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (३) | ६०६६ | १० | भंडारा जिल्हयात साकोली, व लाखांदूर तालुक्यातील मागासवर्गीय मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह उपलबध नसणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात तालुका स्तरावर शासकीय निवासी आश्रमशाळा उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ५९७१ | १० | मालवणी मालाड (पश्चिम) मुंबई या विभागात मागासवर्गीय मुलां व मुलींसाठी शासकीय वसतीगृह नसणे, मालवणी येथे मुलांमुलींचे शासकीय वसतीगृहाची नितांत आवश्यकता असणे, वसतीगृहाअभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २४ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव(१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई